
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर



पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर
पोलीस कल्याण शाखा
मालटेकडी जवळ, कॅम्प रोड अमरावती
ई-मेल cp.amravati@mahapolice.gov.in

दिनांक ०२/०१/२०२५

# प्रेस नोट

दिनांक ०२/०१/२०२५ ते ०८/०१/२०२५ या कालावधीत पोलीस वर्धापन दिन (रेझिंग डे ) कार्यक्रम साजरा करण्यात येतो त्यामधे समाजातील वातावरण सुरक्षित राहावे तसेच जनतेमध्ये पोलीस दलाप्रती विश्वास निर्माण होण्याचे दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियम व सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. पो.स्टे. स्तरावर शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थीना शस्त्र व पोलीसांचे इतर कामकाजाबाबत माहिती देण्यात येते.

दिनांक ०२.०१.२०२५ रोजी ११.०० वा. . पोलीस कवायत मैदान अमरावती शहर येथे मा. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी यांनी पोलीस वर्धापन दिन-२०२५ चे उद्घाटन केले. रेझिंग डे निमीत्त प्रदर्शनीतील शस्त्र, सायबर, महिला व बाल अत्याचार, दामिनी पथक , बॉम्ब शोधक व नाशक पथक, डायल-११२, दंगा नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक , श्वान पथक , बिनतारी संदेश विभाग, वाहतुक शाखा , फिंगर प्रिंट चे विविध स्टॉल लावुन पोलीस दलातील आधुनिक यंत्रसामुग्रीची माहीती विद्यार्थाना देण्यात आली. सदर प्रदर्शनी पुढील २ दोन दिवस पोलीस कवायत मैदान येथे राहणार असुन विद्यार्थी व नागरिकांनी पोलीस दलास जवळुन माहीती घेण्यास खुली असुन त्याचा लाभ घेण्याचे आवाहन मा.पोलीस आयुक्त यांनी केले. पोलीस वर्धापन दिना निमित्त उद्घाटन प्रसंगी श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), श्री. सागर पाटील पो.उपायुक्त परिमंडळ-1 , श्री. गणेश शिंदे पो.उपायुक्त परिमडळ-2, तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त व ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. नवोदय विद्यालय नवसारी, मनपा माध्यमिक मराठी शाळा वडरपुरा , अमरावती पोलीस पब्लीक स्कुल पोलीस मुख्यालय, जि. प. माध्यमिक कन्या शाळा कॅम्प अमरावती , जि.प. उर्दु शाळा , मेहफील इन , मनपा उर्दु माध्यमिक शाळा जमील कॉलनी अमरावती येथील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित राहुन पोलीस दलाचे कामाकाजाची जवळुन माहीती घेतली.


महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर
महाराष्ट्र पोलीस
अमरावती शहर


अमरावती शहर जिल्हा
होय मी
यमराज
बोलतोय
हेल्मेट
वापरा
जीव
वाचवा
मपोसे
PG
MAXX SENATOR